सो.रजि.नं.एम.एच.५१४/ए/एन/आर/८२,बी.पी.टी.रजि.नं.एफ/४६८ (अहमदनगर)
एन.एस.के./टेक/१२ ए. (ए)/५८/१९९४-९५

# श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

फोन :- (०२४८८) २३०९९९

289

जा.क.मळगंगा ट्रस्ट/१०५/२०२३-२४ दि.११/०३/२०२४

प्रति,
मान.लोकनेते, आमदार श्री.निलेशजी लंके साहेब,
पारनेर व नगर विधानसभा मतदार संघ,
मु.पो.ता.पारनेर, जि.अहमदनगर.

विषय - निघोज ते श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळ रस्ता मळगंगा यात्रेपूर्वी दुरूस्त होणेबाबत...

महोदय,

वरील विषयाबाबत नम्र निवेदन करतो की, चालू वर्षी श्री मळगंगा देवीची यात्रा दिनांक १ मे २०२४ ते दिनांक ५ मे २०२४ दरम्यान संपन्न होत आहे. सदर यात्रेमध्ये महाराष्ट्राच्या कानाकोप-यामधून सुमारे ४ ते ५ लाख भाविक येत असतात. परिणामी निघोज ते कुंड रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ होत असते. सध्या सदर रस्त्याचे अवलोकन केल्यास अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून रस्त्याच्या कडेने झाडे वाढलेली आहेत. मागील वर्षी यात्रेपूर्वी सदरचा रस्ता जिल्हा परिषदेमार्फत दुरूस्त करण्यात आलेला होता.

तरी मे.साहेबांना नम्र विनंती की, कृपया यात्रेपूर्वी सदरचा रस्ता दुरूस्तीचे आदेश संबंधीत खात्यास देऊन सहकार्य करावे.

कळावे.

आपला विश्वासू,

श्री.शांताराम बापूराव कळसकर
सचिव
श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज